# संजीवनी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य

आयोजित

# संजीवनी अभिरूप युवा विधानसभा

**(Maharashtra Youth Assembly)**

Reg.No.: 795/2019

Reg.No.: MAHA/ F - 22350



आवक दिनांक 25 JAN 2023 428 जावक दिनांक 25 JAN 2023


प्रति,

दि. २५ / ०१ / २०२३

कुलगुरू

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

पुणे.


मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
25 JAN 2023
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 806
जावक दिनांक: 28-1-23

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 138
30 JAN 2023
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


**विषय : संजीवनी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित 'संजीवनी अभिनव युवा विधानसभा' व 'युवा प्रेरणा शिबिर' उपक्रमात आपल्या विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांना सहभागी होणेबाबत परिपत्रक काढणे....**

महोदय,

आजचे तरुण उद्याच्या भारताचे अग्रदूत ठरावेत, स्वतःच्या परिवाराचे व समाजाचे खऱ्या अर्थाने सारथी बनावेत व सर्वात मोठ्या युवा जगतात तरुणाईला दिशादर्शक ठरणाऱ्या 'सक्रीय युवक घडणीत' आपणही आपल्या विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांना सहभागी होणेबाबत परिपत्रक काढणेसाठी सदर पत्र देत आहोत.

सन २०१९ पासून विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या **संजीवनी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य** या बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शैक्षणिक व स्पर्धात्मक माध्यमात तरुणाईला सकारात्मकतेसाठी एकत्र आणण्यासाठी यावर्षीपासून संजीवनी अभिरूप युवा विधानसभेचे आयोजन करत आहोत. त्यासंदर्भात राज्यात एकाच वेळी 288 विधानसभा मतदारसंघासाठी **'संजीवनी अभिरूप युवा विधानसभा'** व **'युवा प्रेरणा शिबिर'** उपक्रमाची योजना हाती घेत आहेत.

स्पर्धेच्या व गर्दीच्या जगात सक्षम व्यक्तिमत्वासाठी अपेक्षित व्यवहारज्ञान, कार्यकुशलता, सचोटी, आर्थिक साक्षरता, शारीरिक क्षमता, आपल्या विषयाचे ज्ञान वाढवण्यासाठी सातत्याने इच्छाशक्ती, कार्यावर निष्ठा, आदी गुण यशस्वी व्यक्तिमत्त्वाला आवश्यक ठरणार आहेत. तसेच लोकशाही मूल्ये, सर्वसमावेशकता व संसदीय पद्धतीचा आचार वाढावा यासाठी वाद-संवाद, दृष्टिकोन, दूरगामी विचार, निर्णयक्षमता, आदींसाठी भाण असणारी पिढी ही काळाची गरज आहे. म्हणूनच आपल्या विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांना या अभिरूप युवा विधानसभेत सहभागी करुन सहकार्य करावे ही विनंती.

**डॉ. ज्ञानेश्वर वसंतराव सानप**

चेअरमन, संजीवनी फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य

## प्रस्तावना

संजीवनी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या माध्यमातून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्रातील युवा वर्गासाठी संजीवनी अभिरुप युवा विधानसभा या अभिनव उपक्रमाची सुरुवात करताना आम्हा सर्व सहकाऱ्यांना मनस्वी आनंद होत आहे.

महाराष्ट्र राज्याला वैचारिक कृतिशील नेतृत्वाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. राज्यातील अनेक भागातील सर्वसामान्य कुटुंबातील युवकांनी राज्याच्या राजकारणात फिनिक्स भरारी घेतलेली आहे. मात्र सध्याच्या परिस्थितीचा विचार जर केला तर युवक वा युवती सध्या राजकीय, सामाजिक क्षेत्राकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे. तर काही ठिकाणी इच्छा असूनही योग्य मार्गदर्शना अभावी राजकारणात युवा पिढी भरडली जात आहे. अशा परिस्थितीमध्ये कौशल्याधिष्ठित युवा पिढी घडवण्याचा उद्देश समोर ठेवून **संजीवनी फाउंडेशन** महाराष्ट्र राज्यातील पहिल्याच **अभिरूप युवा विधानसभेचे आयोजन करत आहे.** या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील सर्व विद्यापीठांच्या संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील उत्सुक, होतकरू युवकांचे संघटन करत राज्यातील युवकांची पहिलीच अभिरूप विधानसभा निर्वाचित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्राच्या नवनिर्मितीचे स्वप्न पाहून समाजातील सर्व घटकांपर्यंत शासकीय योजना, विकास आराखडे पोहोचवत शासन दरबारी सर्वसामान्यांच्या व्यथा पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे. राज्यातील 288 विधानसभा मतदार संघांमध्ये संबंधित महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन प्रत्येक विधानसभा मतदार संघासाठी प्रत्येकी एक **युवा संजीवनी आमदार** तयार करण्याचा आमचा मानस आहे. जेणेकरून आम्ही पुढे आणलेला **अभिरूप युवा प्रतिनिधी** त्या संबंधित मतदार संघातील लोकप्रतिनिधींशी विचारविनिमय करून सर्वसामान्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करेल. ज्येष्ठ लेखक उत्तम कांबळे असं म्हणतात **एकटीस गेले बाई, झाड काही हलल नाही. मिळूनी साऱ्याजणी, झाड काही राहिलं नाही.** म्हणजे एकजुटीची ताकद ही प्रामुख्याने समाजाला उन्नती च्या मार्गाने नेऊ शकते.

## वैशिष्ट्ये

1. **संजीवनी अभिरूप युवा विधानसभा** उपक्रमाचे परिपत्रक संजीवनी फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांना पाठवले जाईल.

2. परिपत्रकानुसार राज्यातील प्रत्येक **महाविद्यालयातील युवक - युवती** संजीवनी अभिरूप युवा विधानसभा या उपक्रमामध्ये सहभागी होऊ शकतात.

3. प्रत्येक जिल्ह्यातील सहभागी विद्यार्थ्यांसाठी **संजीवनी अभिरूप युवा विधानसभा जिल्हास्तरीय परिषद** जिल्हास्तरावर आयोजित केली जाईल.

4. जिल्ह्यातील प्रत्येक **विधानसभा मतदारसंघासाठी** निवडण्यात येणाऱ्या युवा **प्रतिनिधींची निवड प्रक्रिया,** मुलाखतीचा कार्यक्रम या **जिल्हास्तरीय परिषदेच्या** माध्यमातून स्पष्ट केला जाईल.

5. **संजीवनी अभिरूप युवा विधानसभा** या अभिनव उपक्रमासाठी **नामवंत तज्ञांची** निवड समिती स्थापन केली जाईल. आणि त्या समितीमार्फत **प्रत्येक जिल्हास्तरावर निवड कार्यक्रम** राबविण्यात येईल.

6. निवडण्यात आलेल्या राज्यातील **प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील** युवा प्रतिनिधींचा **शपथविधी सोहळा** आयोजित करून राज्य पातळीवर **अभिरूप मंत्रिमंडळाची** स्थापना केली जाईल.

7. निवडण्यात आलेल्या **युवा प्रतिनिधींसाठी** हिवाळी, पावसाळी आणि अर्थसंकल्पीय **अधिवेशनाच्या कार्यक्रमांची** तरतूद केली जाईल.

8. प्रत्येक **युवा प्रतिनिधीसाठी** त्या संबंधित मतदारसंघासाठी **२१ कलमी विकास कार्यक्रम आराखडा** दिला जाईल.

9. सदर **युवा विधानसभेचा** व **प्रत्येक युवा प्रतिनिधीचा** कालावधी त्या संबंधित मतदारसंघासाठी **१ वर्षांचा** असेल.

10. **सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानपत्र** देऊन गौरविण्यात येईल.

## स्पर्धेचे नियम व अटी

१. **संजीवनी अभिरूप युवा विधानसभा** ही स्पर्धा महाराष्ट्र राज्यातील **१८ ते २७ वयोगटातील युवा-युवतींसाठी** खुली असेल.

२. सदर स्पर्धेचे भाषा माध्यम **मराठी, हिंदी, इंग्रजी** असेल.

३. सदर स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी **http://www.sanjivanifoundation.in** या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

४. सदर स्पर्धेचा **कालावधी १ वर्षाचा** असेल.

५. सदर स्पर्धेसाठी स्पर्धकांना **दि. १५ फेब्रुवारी २०२३** पर्यंत नोंदणी करता येईल.

६. सदर स्पर्धेत सहभाग नोंदवलेल्या स्पर्धकांची मुलाखत दिनांक **१ मार्च २०२३ ते १५ एप्रिल २०२३** या कालावधीत **जिल्हास्तरावर** घेण्यात येईल.

७. सदर स्पर्धेमध्ये मुलाखत प्रक्रियेतून एका विधानसभा मतदारसंघासाठी **१ युवा प्रतिनिधी + १० युवा सदस्य** निवडण्यात येईल.

८. निवड झालेल्या स्पर्धकांची माहिती दिनांक **२० एप्रिल २०२३** रोजी **संजीवनी फाउंडेशनच्या संकेतस्थळावर** जाहीर केली जाईल.

९. सदर स्पर्धेचा कालावधी **१ मे २०२३ ते ३१ एप्रिल २०२४** असा असेल.

१०. सदर स्पर्धेसाठी ९९९ रुपये नोंदणी फी असेल, स्पर्धकांना नोंदणी करताना ऑनलाइन जमा करावी लागेल.

११. मुलाखत प्रक्रियेसाठी **संजीवनी फाउंडेशनच्या** वतीने नियुक्त केलेल्या **तज्ञ परीक्षकांचा** निर्णय अंतिम राहील.

१२. सदर स्पर्धेच्या नियोजनात **ऐनवेळी** बदल करण्याचा अधिकार स्पर्धेच्या **समन्वय समितीकडे** राखीव असेल.

१३. **संजीवनी फाउंडेशन** ही बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्याच्या **सामाजिक चळवळीचा मानबिंदू** ठरलेली असल्याकारणाने स्पर्धेवर अथवा स्पर्धेच्या नियोजनावर, निकालावर बोट ठेवणाऱ्या **सन्माननीय व्यक्तींनी** सदर स्पर्धेत सहभाग नोंदवू नये.

* सदर संजीवनी अभिरुप युवा विधानसभा या अभिनव उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दि. १५ फेब्रुवारी २०२३ या तारखे पर्यंत नोंदणी करता येईल.

* सदर संजीवनी अभिरुप युवा विधानसभा या अभिनव उपक्रमाचा कालावधी दि. १ मे २०२३ ते ३१ एप्रिल २०२४ पर्यंत असेल.

* सदर उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा मुलाखत कार्यक्रम दि. १ मार्च २०२३ ते १५ एप्रिल २०२३ या कलावधी मध्ये जिल्हा स्तरावर घेण्यात येईल.

* सदर उपक्रमात नाविण्य मिळविणाऱ्या स्पर्धकांचा राज्यस्तरीय संसदपटू पुरस्काराने यथोचीत सन्मान केला जाईल.

* या उपक्रमात कृतीशील ११ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी करणाऱ्या सर्वोत्कृष्ट महाविद्यालयाचा सन्मान महामहीम राज्यपाल महोदयांच्या शुभहस्ते करण्यात येईल.

संजीवनी फाऊंडेशन म. राज्य रजि. नं. F-22350

**डॉ. ज्ञानेश्वर वसंतराव सानप**
चेअरमन, संजीवनी फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य


www.sanjivanifoundation.in
sanjivanifoundation2019@gmail.com

महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वांच्याच सेवेसाठी

# संजीवनी फाउंडेशन

## महाराष्ट्र राज्य

(महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक चळवळीचा मानबिंदू)

आयोजित

# संजीवनी अभिरूप युवा विधानसभा

(Maharashtra Youth Assembly)

तरुणाईला बळ देण्यासाठी...
लोकशाहीला बळकट करण्यासाठी...!

**महाराष्ट्रातील सर्वात मोठा अभ्यास वर्ग,**
**भविष्यातील राजकीय नेते**
**विकसीत करण्यासाठी...!**

गुणवंतांनो या...
प्रेरणेच्या चैतन्यदायी प्रवाहात सहभागी व्हा..!




अधिक माहितीसाठी

+91 80555 12655 / 80555 12677

www.sanjivanifoundation.in

sanjivanifoundation2019@gmail.com

sanjivanifoundationmaharashtra

Sanjivani_foundation